# डाळिंब फळांच्या हार्वेस्टिंगला विलंब करण्यासाठीचा सल्ला

**भा. कृ. अनु. प. - राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर – ४१३२५५**

सर्व साधारणपणे हस्त बहार (ऑक्टोबर – नोव्हेंबर २०१९) मध्ये फुलधारणा झालेल्या बागा एप्रिल – मे २०२० मध्ये काढणीस तयार होतील परंतु सद्यस्थिती मध्ये कोरोना वायरसच्या जागतिक महामारीमुळे शेतीमालाच्या विपणन व्यवस्थेमध्ये अनिश्चततेचे वातावरण आहे. याकरिता काढणी कालावधी काही दिवसांनी वाढविण्याकरिता डाळिंब संशोधन केंद्रामार्फत निर्देशित मार्गदर्शक सूचनाचा अवलंब केल्यास फळांची काढणी शेतकर्‍यांना काही दिवस विलंबाने करता येऊ शकेल.

डाळिंब फळाची काढणी ही फळे पूर्णत पक्व झाल्यानंतरच करणे जरुरीचे असते. अपरिपक्व फळे झाडावरून तोडल्यास त्याची गुणवत्ता खराब होऊ शकते तसेच अशा फळांची साठवण क्षमता ही खूपच कमी असल्याने नुकसान जादा होते.

त्याचबरोबर फळे पक्व झाल्यानंतरही झाडावर तशीच ठेवल्यास त्यांचा दर्जा खराब होतो, अशी फळे तडकतात, फुटतात किंवा फळांच्या आतील दाणे काळे पडतात.

याकरिता खालील उपाययोजनाचा अवलंब केल्यास फळाची काढणी १५ ते २० दिवस उशिराने करता येऊ शकते त्याच बरोबर फळांची साठवण क्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे होणारे संभाव्य नुकसान काही प्रमाणात कमी करता येऊ शकेल.

१) बागेला नियमित पाणी द्यावे जेणेकरून झाडांची शाखिय वाढ जोमाने होऊन फळांची पक्वता उशिराने होईल.

२) सॅलिसिलिक ॲसिड ०.३ ग्रॅम / लिटर (३०० पीपीम) किंवा जिब्रेलिक ॲसिड ०.०२ ग्रॅम / लिटर (२० पीपीम) याची फवारणी केल्यास झाडांची शाखीय वाढ जोमाने होऊन पक्वता कालावधी पुढे जाण्यास मदत होते.

३) कॅल्शियम नायट्रेट २% आणि KH२ PO४ २% प्रमाणे फवारणी घेतल्यास फळांचा पक्वता कालावधी वाढून साठवण क्षमता सुधारण्यास मदत होते.

४) सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी अथवा जमिनीतून वापर टाळावा कारण त्यामुळे फळे लवकर पक्व होतात.

*********************